**स. फौ. ख. क्र. १३८/२०२०**
**शासन वि. दानेश व इतर.**
नि. क्र.

**रोहा येथील प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड यांच्या न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी एस.एस.महाले)**

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २१ अन्वये आरोपीचे प्रतिकथन

| | | |
|---|---|---|
| १ | **गुन्हा घडल्याची तारीख** | २५.११.२०१९ |
| २ | **प्रथम महिती अहवाल दाखल केल्याचा दिनांक** | २६.११.२०१९ |
| ३ | **पोलीस ठाणे गुन्हा क्रमांक** | रोहा १०५/२०१९ |
| ४ | **प्रथम महिती अहवाल देणार** | अंकित रविंद्र मोहिते, वय २६ वर्षे, रा. अंधार आळी, जुन्या कन्या शाळेजवळ, ता. रोहा, जि. रायगड. |
| ५ | **आरोपीचे नाव, वय व पत्ता** | १. दानेश अफसर खान,<br>वय २७ वर्षे,<br>रा. पेठ मोहल्ला, ता. मुरूड जि. रायगड.<br><br>२. फरहान अब्दुल समद गोठेकर,<br>वय २४ वर्षे,<br>रा. शिघ्रे, ता. मुरुड, जि. रायगड. |

६ **गुन्हयाचा तपशील**

दि.२५.११.२०१९ रोजी रात्री ०८.०० वा. च्या दरम्यान या न्यायालयाच्या स्थळसिमेत, रोहा शहराच्या पश्चिमेस, गवळवाडी भागात असलेल्या गुरांच्या गोठयाजवळ, ता. रोहा, येथे तुम्ही आणि विधीसंघर्षीत

बालक यांच्यासह दोन गाय व दोन कालवड यांना टेम्पो नोंदणी क्र. एम एच ०६–बीजी–३८८६ मध्ये दाटीवाटीने कोंबून त्यांचे चारा–पाण्याचे व्यवस्था न करता त्यांना निर्दयतेने वागविले, त्या द्वारे तुम्ही आरोपींनी प्राण्यांना निर्दयतेने वागविण्याचा प्रतिबंध अधिनियम,१९६० चे कलम ११(अ) व (च)अन्वये गुन्हा केल्याबाबत तुमचेवर दोषारोप ठेवण्यात येत आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आणि विधीसंघर्षीत बालक यांच्यासह संरक्षीत प्राणी एकूण दोन गाय व दोन कालवड यांची कत्तलीच्या उद्देशाने वाहतूक केली व त्यामुळे तुमचेवर महाराष्ट्र पशु संवर्धन अधिनियम, १९७६ चे कलम ५, ६ दंडनियम कलम ९ अन्वये गुन्हा केल्याबाबत तुमचेवर दोषारोप ठेवण्यात येत आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र.०१ कडे नमूद जनावरे सदरील टेम्पोद्वारे नेण्याचा कुठलाही परवाना नसताना त्यांची वाहतूक केली व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायद्याच्या कलम ६६/१९२ अन्वये गुन्हा केला आहे.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त गुन्हयाचा तपशील आरोपींना वाचून व समजावून सांगीतला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2022.08.01 18:17:28 +0530

स्थळ : रोहा (एस. एस. महाले)
दिनांक ०१.०८.२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रोहा.